आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३ जुलै २०२४ - बुधवार

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात राज्यसभेचं कामकाज आज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं. लोकसभेचं कामकाज कालच संस्थगित करण्यात आलं होतं. त्यामुळे संसदेचं पावसाळी अधिवेशन संस्थगित झालं आहे.

तत्पूर्वी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रस्तावावर राज्यसभेत झालेल्या चर्चेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज उत्तर दिलं. भारताची राज्यघटना ही प्रत्येक सरकारसाठी दीपस्तंभासारखीच मार्गदर्शक असल्याचं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच राजकीय वारसा नसलेल्या व्यक्तीला राजकारणात येण्याची आणि इतक्या मोठ्या पदावर पोहचण्याची संधी मिळाली, असंही ते म्हणाले. प्रधानमंत्र्यांचं भाषण सुरू असतानाच, विरोधकांनी गदारोळ करत सभात्याग केला.

<><><><><>

राज्य सरकारकडून सर्व वारकऱ्यांचा विमा काढला जाईल. तसंच वारीतल्या वाहनांना येत्या २१ जुलै पर्यंत टोलमाफी केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. विधी मंडळाच्या आवारात आज ते वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><><>

राज्यातल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन  त्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रती हेक्टरी पाच हजार रुपये मदत देण्याची घोषणा पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. यावर्षी लांब धाग्याच्या कापसाची सरकारी खरेदी, केंद्र सरकारनं नमूद केलेल्या नव्या दरानं होईल, असं त्यांनी सांगितलं.

मुंबईतल्या अपुऱ्या पाणी पुरवठ्यावर चर्चा करण्यासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी येत्या शुक्रवारी आपल्या दालनात बैठक बोलावली आहे. आमदार आशीष शेलार यांनी आज विधानसभेत याबद्दल तक्रार मांडली होती.

राज्यातल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आज विधानसभेत केली. ३० जुलैपर्यंत सर्व शाळांमध्ये गणवेश पोहोचतील असं ते म्हणाले.

<><><><><>

सभागृहात आक्षेपार्ह शब्द वापरल्याबद्दल निलंबित झालेले विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. आपल्या निलंबनाचा फेरविचार करावा अशी विनंतीही त्यांनी उपसभापती नीलम गोऱ्हे यांना पत्राद्वारे केली आहे. दानवे यांच्या निलंबनाचा फेरविचार करण्याची मागणी, अनिल परब यांनी सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासात केली. त्यावर प्रश्नोत्तराच्या तासानंतर चर्चा करून याबाबतचा निर्णय घेऊ, असं गोऱ्हे यांनी सांगितलं.

डोंबिवली इथल्या कारखान्यातील स्फोट, पीडितांना मदत आणि कारखान्यांद्वारे होणाऱ्या प्रदुषणाचा मुद्दा आमदार उमा खापरे यांनी मांडला. त्याला मंत्री दीपक केसरकर यांनी उत्तर दिलं. १३ कामगारांपैकी ११ जणांचा विमा काढलेला असून उर्वरित दोघांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपये दिले आहेत, प्रदूषणाच्या मुद्द्यासाठी सुधीर श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

गावठाण विस्तार, शासकीय घरकुल योजना, घनकचरा व्यवस्थापन, पाणी पुरवठा योजनांसारख्या सार्वजनिक कामांसाठी विनामूल्य जमिनी मिळवण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी शेती विकास महामंडळाकडे तातडीनं प्रस्ताव दाखल करावेत, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या आहेत. शेती विकास महामंडळाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आज त्यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. अत्यावश्यक बाब म्हणून शेती महामंडळाच्या जमिनीवरच्या पाणी पुरवठा योजनांची कामं मार्गी लावण्यासाठी अटी आणि शर्थींच्या अधीन राहून पाणी पुरवठा योजनांची कामं तातडीनं सुरू करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित विभागाला दिले.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या नीती आयोगानं राबवलेल्या संपूर्णता अभियानाला आज महाराष्ट्रातल्या **नांदेड** इथं सुरुवात होत आहे. तर **धाराशिव** जिल्ह्यातल्या परंडा तालुक्यात उद्या या अभियानाला सुरुवात होणार आहे. या अभियानात देशातल्या ५०० तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. या अभियानामार्फत जुलै ते सप्टेंबर या

कालावधीत गरोदर मातांची तपासणी, उच्च रक्तदाब आणि मधुमेह तपासणी, गरोदर मातांना पोषण आहार, मृदा आरोग्य पत्रिका आणि स्वयंसहाय्यता गटांना खेळतं भांडवल देण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात **अमरावती, बीड, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, जालना, नंदुरबार, हिंगोली, नाशिक, धाराशिव, पालघर, सोलापूर, वाशिम,वर्धा** आणि **यवतमाळ** या जिल्ह्यांचा या अभियानात समावेश झाला आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात हाथरस जिल्ह्यातल्या फुलराई गावात सत्संगादरम्यान चेंगराचेंगरीमुळे झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत १२१ लोकांचा मृत्यू झाला आहे. उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज घटनास्थळाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

**//<><><><><>//**